**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून मान्यता दिलेल्या नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टिईएम-२०१२/(प्र.क्र.१३९)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २३ जुलै , २०१२.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे पत्र क्र. F.No.Western/2012/1-692714701, दिनांक ०५ जुलै , २०१२.
२) मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ६४१३/२०१२ या प्रकरणी दिनांक १३ जुलै, २०१२ रोजी दिलेले आदेश.

**प्रस्तावना** : रिट याचिका क्र. ८८४७/२००७ या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर प्राप्त झालेले कायदेविषयक अभिप्राय, इत्यादी बांबी विचारात घेऊन शासनाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करिता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०१२ पर्यंत मान्यता दिलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात आले व त्यानुसारच शासनाचे आदेश देखील निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक ३० जून, २०१२ नंतर अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त झालेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रवेशप्रक्रिया न राबविता त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविणे शासनास अभिप्रेत आहे. परंतु द्वारका बहुद्देशीय ग्रामीण विकास फाऊंडेशनचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, राजर्षी शाहू नगर, बोथा रोड, माळविहीर, बुलढाणा ४४३ ००१ या महाविद्यालयाला अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिनांक ३० जून, २०१२ नंतर मान्यता दिल्याने संस्थेने मा. उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ६४१३/२०१२ दाखल केली होती. त्यावर मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी दिनांक १३.७.२०१२ रोजी संस्थेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. त्यास अनुसरुन द्वारका बहुद्देशीय ग्रामीण विकास फाऊंडेशनचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, राजर्षी शाहू नगर, बोथा रोड, माळविहीर, बुलढाणा ४४३ ००१ या नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात बी. फार्मसी - ६० प्रवेशक्षमता पदवी अभ्यासक्रम आणि एम. फार्म फार्मास्युटिकल क्वालिटी अॅश्यूरंस - प्रवेशक्षमता १८ व एम. फार्म फार्माकॉलॉजी प्रवेशक्षमता १८ हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : द्वारका बहुद्देशीय ग्रामीण विकास फाऊंडेशनचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, राजर्षी शाहू नगर, बोथा रोड, माळविहीर, बुलढाणा ४४३ ००१ या औषधनिर्माणशास्त्र नवीन महाविद्यालयात बी. फार्मसी - ६० प्रवेशक्षमता पदवी अभ्यासक्रम आणि एम. फार्म फार्मास्युटिकल क्वालिटी अॅश्यूरंस - प्रवेशक्षमता १८ व फार्माकॉलॉजी - प्रवेशक्षमता १८ हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासह शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि

औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधारकारकरित्या करण्यात येईल.

सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीनुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

रॅगिंगसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

…क, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
…लक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
… गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
सस्था (संचालकांमार्फत)

…तीसाठी :-

…सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, नवी दिल्ली ११०००१.

शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.

…ी/तांशि-४

…our\GR\Modern College.doc